महाराष्ट्र पोलीस

# पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/११८ /२०२३ दि. १०/०८/२०२३

## –: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

*****

**ज्याअर्थी,** ठाणे महानगरपालिका कार्यक्षेत्रात कापूरबावडी वाहतूक उप विभागाचे हद्दीत रिलायन्स अस्टाल्डी जॉइन्ट व्हेन्चर या कंपनीकडून मेट्रो ४ स्टेशनचे आर मॉल कडून विहंग हॉटेल कडे येणारे सर्व्हिस रोडवर काम चालू असल्याने सदर ठिकाणी वाहतूक कोंडी होत असून नमूद ठिकाणचा मार्ग एकेरी करणे आवश्यक आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) घोडबंदर ठाणे मुख्य वाहिनीवरून डावीकडे आर. बी. एल. बॅक व एम. आय. शो रूम समोर यु टर्न घेवून सर्व्हीस रोड मार्गे विहंग हॉटेलकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **आर. बी. एल. बॅक व एम. आय. शोरूम कट समोरील यु टर्न** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने नळपाडा सिग्नल येथून डावे वळण घेवून कोलशेत रोड मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) कोलशेत रोडवरील जोधपूर स्वीटस् समोरून विहंग हॉटेलकडून उजवे वळण घेवून सर्व्हीस रोड मार्गे आर. मॉल मार्गे घोडबंदर रोडचे दिशेने जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **जोधपूर स्वीटस् समोरील रोड** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने नंदीबाबा चौक येथून सरळ पुढे जावून ढोकाळी सिग्नल मार्गे इच्छीत स्थळी जातील.

सदरची अधिसूचना दिनांक ११/०८/२०२३ पासून मेट्रो ४ चे काम पूर्ण होईपर्यंत अंमलात राहील.

(डॉ. विनयकुमार मे राठोड)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे
२/– सदरची अधिसुचनेस प्रसिध्दी देणेस विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे.
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१ ठाणे, ५ वागळे इस्टेट, ठाणे.

CamScanner

पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे.
नियंत्रण कक्ष, ठाणे शहर
ठाणे पोलीस पत्रक

<u>प्रत</u> :– समन्वय अधिकारी ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**<u>प्रत माहिती व कार्यवाहीसाठी,</u>**
स.पो.आ. ठाणे वाहतूक विभाग,/पोनि कापुरबावडी, वागळे, राबोडी वाहतूक उप विभाग.
२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिका–यांकडून आवश्यक सुचना फलके लावून घ्यावीत.

CamScanner